२०१४१२१७१३२०२३२४२७

पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आंत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत –

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे],
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.
दिनांक :– २.९.८९.

परिपत्रक :–

ह्या वर्षीच्या पावसाळयांत झालेल्या अतिवृष्टी व पूर यांमुळे महाराष्ट्रातील ब–याचशा शहरांमध्ये/गांवांमध्ये, नदी किना–यावरील घरांची मोठया प्रमाणावर पडझड झालेली आहे. अशा पडझड झालेल्या घरांची पुनर्बांधणी करण्याचे काम तांतडीने महसूल व वन विभागातर्फे हाती घेण्यांत येत आहे. तथापि, कायम स्वरुपाची व्यवस्था म्हणून अशा संभाव्य पुराचा धोका असणा–या शहरांमध्ये/गांवांमध्ये पुराचा धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आंत कोठल्याही प्रकारचे बांधकामाला परवानगी न देण्याचे शासनाचे धोरण आहे. तेव्हां अशा पडझड झालेल्या घरांची पुनर्बांधणी करतांनासुध्दा याचा विचार केला जावा.

सबब या परिपत्रकान्वये पाटबंधारे विभागातील सर्व संबंधित अधिका–यांना असे कळविण्यांत येते की, पडझड झालेल्या घरांच्या पुनर्बांधणी कार्यक्रम हाती घेतांना संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत संबंधित जिल्हाधिका–यांकडून मागणी आल्यास पाटबंधारे विभागाच्या अधिका–यांनी संबंधित शहरासाठी गावांत पूररेषा आखून देण्याबाबत त्वरेने कार्यवाही करावी. संबंधित शहरात/गावात अशी पूररेषा आखून देतांना त्या ठिकाणचे उपलब्ध वर्षवार पर्जन्यमानाची आकडेवारी व त्या ठिकाणचे जलप्रदाय क्षेत्र तसेच पूर्वी येऊन गेलेल्या मोठ्या पुरांच्या गावातील खुणा या बाबींचा विचार करुन तसेच धरण सुरक्षितता मॅन्यूअलमधील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे पूरप्रतिबंधक रेषा [Prohibitive Zone i.e. Blue Zone ] तसेच सावधानतेचा इशारा देण्याच्या दृष्टीने पूररेषा [Restrictive Zone i.e. Red Zone ] आखून देण्याबाबत कार्यवाही करावी.

सही/–
[ द. ल. थोरात ]
शासनाचे सहाय्यक सचिव

प्रत – सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय,
पाटबंधारे विभागातील सर्व प्रादेशिक मुख्य अभियंते,
सर्व अधीक्षक अभियंते,
सर्व कार्यकारी अभियंते.

२०१४१२१६१३२०३५६१२६

पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आंत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे],
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१. ९. १९८९.

वाचावे :- शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे], दिनांक २. ९. १९८९.

परिपत्रक :-

पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर यांमुळे काही वेळा शहरांमध्ये/ गावांमध्ये नदी किना-यावरील घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड होते. पडझड झालेल्या घरांचा पुनर्बांधणी कार्यक्रम महसूल व वन विभागातर्फे हाती घेतांना संबंधित जिल्हाधिका-यांकडून पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांकडे संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत मागणी आल्यास संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबतच्या सूचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. आता पूरक्षेत्र [ Flood Zones ] व संबंधित पूररेषा यांच्या आखणीविषयी तसेच पूरक्षेत्रातील जमिनीच्या वापराबाबत धरण सुरक्षितता संहिता प्रकरण-८, १९८४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे खालीलप्रमाणे अधिक सविस्तर खुलासा या परिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे. त्यांमध्ये वापरण्यात आलेले शब्दप्रयोग, जसे की, निषिध्द क्षेत्र, निषेधक पूररेषा इ. यापुढे मराठीत वापरात आणावेत.

महत्वाच्या पूररेषा ह्या मुख्यत्वेकरुन दोन प्रकारच्या आहेत. निषेधक पूररेषा की ज्या कोणत्याही वर्षी पूर येण्याच्या शक्यतेमुळे बांधकामाचे दृष्टिकोनातून ते क्षेत्र निषिध्द ठरवितात. नियंत्रक पूररेषा ह्या पर्जन्यमानाचे दृष्टीने कोणत्याही वर्षी [परंतु साधारण १०० वर्षांत एकदा] ज्या ठिकाणापर्यंत पूर येऊ शकतो, तो तलांक दर्शवितात. म्हणून बांधकामे केली तरी पूर येणारच नाही असे गृहित न धरता नियंत्रित प्रकारचे बांधकाम या रेषेखाली परंतु निषिध्द क्षेत्र वगळून करता येईल. ही क्षेत्रे व पूररेषा खालीलप्रमाणे असाव्यात.

अ] निषिध्द क्षेत्र [ Prohibited Zone ] :-

धरणाचे जलाशयातून नियंत्रित पध्दतीने नदीत सोडण्यात येणारा विसर्ग व तसेच धरणाखालील मुक्त पाणलोट क्षेत्रामुळे येणारा पावसाळ्यातील विसर्ग वाहून नेण्यास जे नदीचे मुख्य पात्र व त्याचे लगतचे क्षेत्र आवश्यक असते त्याला " निषिध्द क्षेत्र " म्हणावे. हे प्रत्यक्षात ठरवितांना सरासरीने २५ वर्षांतून एकदा या वारंवारितेने [ Frequency ] येणारा पूरविसर्ग किंवा प्रस्थापित नदीपात्राच्या विसर्गक्षमतेच्या दीडपट विसर्ग यांतील जास्तीचा विसर्ग वाहून नेण्यासाठी जे नदीचे पात्र व त्यालगतचे क्षेत्र आवश्यक असेल ते क्षेत्र " निषिध्द क्षेत्र " म्हणून

अशा क्षेत्राचा उपयोग फक्त मोकळया जमिनीच्या स्वरुपांत उदा. उद्याने, खेळाची मैदाने किंवा हलकी पिके घेणे [ ज्या ठिकाणी पिके घेण्याचा हक्क पारंपारिक वापरामुळे प्रस्थापित झाला आहे अशा ठिकाणी ] अशासारख्या कारणांसाठीच केला जावा.

ब] निषेधक पूररेषा [ Blue Line ] :-

नदीचे दोन्ही तीरांवरील निषिध्द क्षेत्राची हद्द ठरविणा-या गावाजवळील अशा पुराच्या हिशोबाने जी पाण्याची पातळी येईल तिच्या समतल रेषांना त्या गावातील " निषेधक पूररेषा " असे संबोधिण्यांत यावे.

क] नियंत्रित क्षेत्र [ Restrictive Zone ] :-

संकल्पित महत्तम पूर वाहून नेण्यासाठी वरीलपेक्षा जास्त वहन-क्षेत्राची आवश्यकता लागेल. संकल्पित महत्तम पूर प्रवाह हा प्रकल्पाचे संकल्पनातील सांडव्यावरुन वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग व धरणा-खालील स्वतंत्र पाणलोट क्षेत्रातून तसाच अपेक्षित पूरविसर्ग यांचेमुळे येणारा एकत्रित पूरविसर्ग धरण्यांत यावा. ज्या भागांत धरण नसेल त्या भागांत १०० वर्षांतून एकदा या वारंवारितेचा पूरविसर्ग विचारांत घेण्यांत यावा.

हा संकल्पित महत्तम पूर वाहून नेण्यासाठी लागणा-या क्षेत्रांतून "निषिध्द क्षेत्र" वगळता उरणा-या नदीचे दोन्ही तिरांवरील क्षेत्रास "नियंत्रित क्षेत्र" असे संबोधिण्यांत यावे. नियंत्रित क्षेत्रांतील बांधकामांच्या तळमजल्याच्या जोत्याची पातळी सुरक्षित उंचीपर्यंत असावी, की ज्यामुळे पूरपातळी नियंत्रित क्षेत्रात जास्त प्रमाणात चढावयाचे आंत अशा इमारतीं-मधील माणसे इमारत सोडून सुरक्षित ठिकाणी सहजतेने जाऊ शकतील. ही उंची हयाशी संबंधित स्थानिक अधिका-यांनी जमिनीचा चढउतार व उपलब्ध रस्त्याचे तलांक इ. बाबी विचारांत घेऊन ठरविणे अपेक्षित आहे. तसेच इमारतींचे बांधकाम अशा प्रकारचे असावे की, जे क्वचित येऊ शकणा-या पुरामुळे कोसळणार नाही.

अशा क्षेत्रातील इमारतींच्या वापराबाबतची बंधने देखील सुस्पष्टपणे विहित असणे आवश्यक आहे. हे करतांना या क्षेत्रामध्ये येणारा संभाव्य पूर व तसेच पुरामुळे होणारी जीविताची हानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी हया क्षेत्रातील लोकांना, जनावरांना व वस्तूंना अल्पावधीची पूरसूचना मिळताच हे क्षेत्र तातडीने सोडून सुरक्षित स्थळी जाणे / नेणे आवश्यक राहील, याचा विचार व्हावा.

ड] " नियंत्रक पूररेषा " [ Red Line ] :-

नदीचे दोन्ही तिरांवरील नियंत्रित क्षेत्राची हद्द ठरविणा-या समतल रेषांना "नियंत्रक पूररेषा" म्हणून संबोधिण्यांत यावे.

वरील बाबींचा विचार करुन पुराचा संभाव्य धोका असणा-या

पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे
शहरांमध्ये/गावांमध्ये वरील प्रकारच्या पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे त्याचप्रमाणे वरील सूरसेत्रा-
विभागाच्या अधिका-यांनी कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे वरील सूरसेत्रा-
साठी नकाशे तयार करतांनाही धरण सुरक्षितता संहितेच्या प्रकरण ८ मधील
सूचनांचे अनुषंगाने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ द. ल. थोरात ]
शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रत -

सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंते, पाटबंधारे विभाग,
सर्व अधीक्षक अभियंते, पाटबंधारे विभाग,
सर्व कार्यकारी अभियंते, -"-
सर्व तांत्रिक कार्यासने / तांत्रिक अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

**पूररेषेच्या आत अपरिहार्य बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार क्षेत्रिय मुख्य अभियंता यांना प्रदान करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

**शासन परित्रक क्रमांकः एफडीडब्ल्यू-२०१३/(प्र.क्र.२८१/२०१३)/सिं.व्य.(म)**

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक: ११ जुलै, २०१४

**वाचा :-**

**शासन परिपत्रक क्रमांकः एफडीडब्ल्यू-१०८९/ प्र.क्र.२४३/ ८९/सिं.व्य.(कामे), दिनांक २१.०९.१९८९**

**शासन परित्रक:-**

शहरांच्या/ गावांच्या/ तिर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने नदीवर पूल बांधणे, पूलाचे दोन्ही बाजूने पोहोच रस्ते तयार करणे, शहराच्या विकास आराखड्यानुसार नदीच्या बाजूने जाणारे रस्ते, उद्याने व जॉगिंग ट्रॅक तयार करणे तसेच पूर संरक्षक कामांतर्गत नदीच्या तीरालगत पूर संरक्षक भिंती बांधणे, घाट बांधणे या शिवाय गॅस पाईपलाईन क्रॉसिंग करणे, विद्युत वाहिनी क्रॉसिंग करणे, नदीच्या कडेने ड्रेनेज पाईपलाईन टाकणे इ. प्रकारची अपरिहार्य कामे नदीच्या निषेधक पूररेषेच्या (Blue line) आत निषिद्ध क्षेत्रात करावी लागतात. सदर कामांच्या बांधकामासाठी संबधित यंत्रणेमार्फत ना हरकत प्रमाणपत्रांची मागणी जलसंपदा विभागाकडे करण्यात येते.

धरण सुरक्षा संहिता प्रकरण ७ मधील मुद्दा क्र.१०.९ नुसार निषेधक पूर रेषा (Blue line) व नियंत्रक पूर रेषा (Red line) यांचे नकाशे व पूर प्रभावित क्षेत्र निश्चिती असे नकाशे/ आराखडे मंजूर करण्याचे प्राधिकार खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

i) मोठे प्रकल्प- मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग

ii) मध्यम प्रकल्प- अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग

iii) लघु प्रकल्प- कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

सदर आराखडयाद्वारे निश्चित केलेल्या पूर प्रभावित क्षेत्र व निषिद्ध क्षेत्रात विविध विभागांकडून काही अपरिहार्य कामे करणे आवश्यक असल्यास अशा कामासाठी जलसंपदा विभगाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात येत आहे. या संबंधीत क्षेत्रिय मुख्य अभियंता यांच्या स्तरावर ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात यावी.

क्षेत्रिय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांनी असे ना हरकत प्रमाणपत्र देताना धरण सुरक्षा संहितेमधील संबंधित तरतुदी, प्रचलित कायदे, नियम, शासन आदेश यांचा विचार करुन भविष्यात प्रस्तावित कामांना व परिसरात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत याची खात्री करावी तसेच शासनाचे हीत लक्षात घेऊन आवश्यक अटी शर्तींचा समावेश करुन ना हरकत प्रमाणपत्र संबंधीत अभिकरणास प्रदान करावे. सदरील ना हरकत प्रमाणपत्र म्हणजे बांधकामाची परवानगी नव्हे; आवश्यक त्या परवानग्या व इतर विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे ही संबंधित अभिकरणाची जबाबदारी राहील असेही जलसंपदा विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रात नमूद करावे.

मुख्य अभियंता स्तरापेक्षा खालील दर्जाच्या अधिकाऱ्यांना असे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार पुनप्रत्यार्पण (No delegation) करण्यात येवू नयेत. याबाबत भविष्यात कोणतेही परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत मुख्य अभियंता यांची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७१११५४६०१५०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yashavantrao Kashinath Bhadane

Digitally signed by Yashavantrao Kashinath Bhadane
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Yashavantrao Kashinath Bhadane
Date: 2014.07.11 15:46:24 +05'30'

(य.का.भदाणे)

शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग,
३. सर्व मुख्य अभियंता व मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग,
४. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
५. संचालक, नगर विकास विभाग, पुणे,
६. सर्व अधीक्षक अभियंता/अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग,
७. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
८. सर्व जिल्हाधिकारी, महसूल विभाग,
९. सर्व तांत्रिक कार्यासन/ तांत्रिक अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१०.सिं.व्य.(महसूल) संग्रहार्थ.

**पूररेषेच्या आत अपरिहार्य बांधकामास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार क्षेत्रिय मुख्य अभियंता यांना प्रदान करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः एफडीडब्ल्यू-२०१३/(प्र.क्र.२८१/२०१३)/सिं.व्य.(महसूल),**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ८ ऑगस्ट, २०१४

**वाचा :-**

१) शासन परिपत्रक पाटबंधारे विभाग क्र.एफडीडब्ल्यू-१०८९/प्र.क्र.२४३/८९/सिं.व्य.(कामे), दिनांक २१.०९.१९८९

२) शासन परिपत्रक जलसंपदा विभाग क्रमांकः एफडीडब्ल्यू-२०१३/(प्र.क्र.२८१/२०१३) /सिं.व्य. (महसूल), दिनांक ११ जुलै, २०१४

**प्रस्तावना:-**

उपरोक्त शासन परिपत्रक जलसंपदा विभाग क्रमांकः एफडीडब्ल्यू -२०१३/ (प्र.क्र.२८१ /२०१३)/सिं.व्य.(महसूल) दिनांक ११ जुलै, २०१४ हे संकेतस्थळावर अपलोड करतांना त्यात काही दोष राहून गेले होते. त्यामुळे सदर शासन परिपत्रक रद्दबातल करून दोषरहीत परिपत्रक निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.तरी दि.११ जुलै, २०१४ चे परिपत्रक अधिक्रमीत करून खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक:-**

शहरांच्या/ गावांच्या /तिर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने नदीवर पूल बांधणे, पूलाचे दोन्ही बाजूने पोहोच रस्ते तयार करणे, शहराच्या विकास आराखड्यानुसार नदीच्या बाजूने जाणारे रस्ते, उद्याने व जॉगिंग ट्रॅक तयार करणे तसेच पूर संरक्षक कामांतर्गत नदीच्या तीरालगत पूर संरक्षक भिंती बांधणे, घाट बांधणे या शिवाय गॅस पाईपलाईन क्रॉसिंग करणे, विद्युत वाहिनी क्रॉसिंग करणे, नदीच्या कडेने ड्रेनेज पाईपलाईन टाकणे इ. प्रकारची अपरिहार्य कामे नदीच्या निषेधक पूररेषेच्या (Blue line) आत, निषिद्ध क्षेत्रात करावी लागतात. सदर कामांच्या बांधकामासाठी संबधित यंत्रणेमार्फत ना हरकत प्रमाणपत्रांची मागणी जलसंपदा विभागाकडे करण्यात येते.

धरण सुरक्षा संहिता प्रकरण ७ मधील मुद्दा क्र.१०.९ नुसार निषेधक पूर रेषा (Blue line) व नियंत्रक पूर रेषा (Red line) यांचे नकाशे व पूर प्रभावित क्षेत्र निश्चिती असे नकाशे/ आराखडे मंजूर करण्याचे प्राधिकार खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

i) मोठे प्रकल्प- मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग

ii) मध्यम प्रकल्प- अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग

iii) लघु प्रकल्प- कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

सदर आराखडयाद्वारे निश्चित केलेल्या पूर प्रभावित क्षेत्र व निषिद्ध क्षेत्रात विविध विभागांकडून काही अपरिहार्य कामे करणे आवश्यक असल्यास अशा कामांसाठी जलसंपदा विभागांतर्गत क्षेत्रिय मुख्य अभियंता यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

असे ना हरकत प्रमाणपत्र देताना धरण सुरक्षा संहितेमधील संबंधित तरतुदी, प्रचलित कायदे, नियम, शासन आदेश यांचा विचार करुन भविष्यात प्रस्तावित कामांना व परिसरात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत याची खात्री करावी तसेच शासनाचे हीत लक्षात घेऊन आवश्यक अटी शर्तीचा समावेश करुन ना हरकत प्रमाणपत्र संबंधित अभिकरणास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांनी प्रदान करावे. सदरील ना हरकत प्रमाणपत्र म्हणजे बांधकामाची परवानगी नव्हे; आवश्यक त्या परवानग्या व इतर विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे ही संबंधित अभिकरणाची जबाबदारी राहील असेही जलसंपदा विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्रात नमूद करावे.

मुख्य अभियंता स्तरापेक्षा खालील दर्जाच्या अधिकाऱ्यांना असे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रत्यायोजन (delegation) करण्यात येवू नयेत. याबाबत भविष्यात कोणतेही परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत मुख्य अभियंता यांची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१४०८०८१६५९३९६१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Yashavantrao Kashinath Bhadane

Digitally signed by Yashavantrao Kashinath Bhadane
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Yashavantrao Kashinath Bhadane
Date: 2014.08.08 17:06:27 +05'30'

**( य.का.भदाणे )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१. सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग,
३. सर्व मुख्य अभियंता व मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग,
४. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
५. संचालक, नगर विकास विभाग, पुणे,
६. सर्व अधीक्षक अभियंता/अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग,
७. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
८. सर्व जिल्हाधिकारी, महसूल विभाग,
९. सर्व तांत्रिक कार्यासन/ तांत्रिक अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१०. सिं.व्य.(महसूल) संग्रहार्थ.